# ग्राहक गा-हाणे निवारण मंच
# महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
# औरंगाबाद परिमंडळ,औरंगाबाद.

तक्रार क्र.सीजीआरएफ/एझेड/यु/३०३/२०१०/३०

तक्रार दाखल दिनांक :- ३१/०८/२०१०
निकाल दिनांक :- ३०/१०/२०१०

सौ.मथुराबाई सर्जेराव मोहिते,
प्लॉट नं.१६५,वसंत नगर,
घृष्णेश्वर कॉलनी,मयुर पार्क रोड,
औरंगाबाद.
(ग्राहक क्र.४९००११७८६४६१) अर्जदार/ग्राहक

विरुध्द

महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादीत शहर मंडल औरंगाबाद.

गैरअर्जदार

| | | |
|---|---|---|
| कोरम | प्रदीप. अ. सगणे | अध्यक्ष / सदस्य सचिव |
| | विलासचंद्र सु. काबरा | सदस्य |

अर्जदाराने ग्राहक गा-हाणे निवारण मंचासमोर 'अनुसुची - अ' मध्ये, महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक गा-हाणे निवारण मंच व लोकपाल ) विनियम २००६ च्या नियम ६.१० अंतर्गत तक्रार दाखल केली आहे.अर्जदाराने दाखल केलेल्या तक्रारीची एक प्रत दिनांक ३१/०८/२०१० रोजी औरंगाबाद शहर मंडळाचे कार्यकारी अभियंता (प्रशासन) व नोडल अधिकारी,औरंगाबाद यांना पाठविण्यात आली. अर्जदाराच्या गा-हाण्याबाबतची सुनावणी दिनांक २१/०९/२०१० रोजी ठेवण्यात आली.

ग्राहकाने दाखल केलेल्या तक्रारीचा सारांश खालीलप्रमाणे आहे.

१) अर्जदाराने घरगुती वापरासाठी महावितरण कंपनीकडुन दिनांक २०/०४/२००४ रोजी वीज पुरवठा घेतला असुन त्यांचा ग्राहक क्रमांक ४९००११७८६४६१ असा आहे.अर्जदारास वीज कनेक्शन घेतले तेव्हा पासुन मीटर रिडींग न घेता चुकीचे व सरासरी आकारणीचे वीज देयक देण्यात आले ते अर्जदारने वेळोवेळी भरलेले आहे. अर्जदारास माहे मार्च ते जुलै २००९ या कालावधीमध्ये अनुक्रमे ६४३,६४३,६९२३,२५२२,७५० युनिटची वीज देयके देण्यात आली. अर्जदाराने चुकीचे वीज देयक दुरुस्त करुन मीळण्याबाबत ब-याच तक्रारी दाखल केलेल्या आहेत. परंतु कंपनीने त्याची दखल घेतलेली नाही.अर्जदाराचे मीटर माहे जुलै २००९ मध्ये बदली करण्यात आले परंतु वीज देयक दुरुस्त न झाल्यामुळे त्यांनी या मंचात तक्रार दाखल करुन मीटर रिडींग नुसार सुधारीत वीज देयक मीळण्याबाबत व मागील ३ वर्षापासुन वारंवार लेखी तक्रारी सादर करुनही सुधारीत वीज देयक न मीळाल्यामुळे झालेल्या मानसीक त्रासापोटी रुपये १०००/- नुकसान भरपाई मीळण्याबाबत विनंती मंचास केली आहे.

२) वरील तक्रारीची सुनावणी दिनांक २१/१०/२०१० रोजी ठेवण्यात आली.सुनावणीच्या दरम्यान नोडल अधिकारी श्री पी.आर.तौर व वीज ग्राहक उपस्थित होते.अर्जदाराने आपली तक्रार वरील प्रमाणे कथन केली. नोडल अधिकारी यांनी लेखी जबाब, सी.पी.एल. व मीटर बदली अहवाल मंचात सादर केला. त्याच्या जबाबानुसार माहे एप्रिल २००७ ते मार्च २००९ या कालावधीत ग्राहकास मीटर रिडींग न घेता वीज बिल देण्यात आल्याचे मान्य केले.माहे मे २००९ मध्ये ग्राहकास मीटर बदली अहवालानुसार ६९२३ युनिटचे एकत्रीत वीज बिल देण्यात आले. त्याचे वरील कालावधीत समान विभाजन करुन सुधारीत वीज बिल देण्याबाबत चा प्रस्ताव मंजुरातीकरीता संबंधित उपकार्यकारी अभियंता यांनी महावितरण कंपनीच्या सक्षम अधिका-याकडे पाठविला असल्याचे दिसुन येते. मंचाने नोडल अधिकारी यांना ग्राहकाचा स्थळ निरिक्षण अहवाल तसेच बदली केलेल्या मीटरचा चाचणी अहवाल दिनांक २७/१०/२०१० रोजी सादर करण्यास सांगुन प्रकरण निकासाठी ठेवले.

३) दोन्ही बाजुकडून सादर केलेल्या कागद पत्रावरुन असे दिसुन येते की, ग्राहकाने वीज पुरवठा घेतल्यापासुन त्यांना महावितरण कंपनीकडुन मीटर रिडींग न घेता सरासरी आकारणी करुन वीज देयक दिलेले असुन ते ग्राहकाने नियमीतपणे भरलेले आहे.माहे मार्च २००९ ते जुलै २००९ या कालावधीत ग्राहकास वरील प्रमाणे मीटर रिडींग न घेता अवास्तव रक्कमेची वीज देयक देण्यात आल्याचे दिसुन येते. ग्राहकाचे तक्रारी नुसार त्याचे मीटर दिनांक ०४/०७/२००९ रोजी बदली करुन त्याठिकाणी नविन मीटर बसविण्यात आले. मीटर बदली अहवालावर जुन्या मीटरचे अंतीम वाचण ७५६८ युनिट असल्याचे नोंद केली आहे. यावरुन ग्राहकाचा वीज वापर प्रति माह २७० युनिट दिसुन येतो. ग्राहकाने वरील मीटर जास्त गतीने फिरत असल्याबाबतची तक्रार करुन मीटर चाचणी करुन मीळण्याबाबत कनिष्ठ अभियंता यांनी दिलेल्या फर्म कोटेशन नुसार रुपये १००/- चा भरणा दिनांक ०७/०३/२००९ रोजी केला आहे. परंतु महावितरण कंपनीने पैसाचा भरणा करुन घेवुनही ग्राहकास मीटर चाचणी करुन दिले नसल्याचे दिसुन येत आहे.नविन मीटर नुसार

ग्राहकाचा वीज वापर माहे जुलै २००९ ते सप्टेबर २०१० या १५ महीन्याच्या कालावधीत एकुण ४३३ युनिट व प्रति माह २९ युनिट झाला असल्याबाबत कनिष्ठ अभियंता यांनी दिनांक २३/०९/२०१० रोजी घेतलेल्या स्थळ निरिक्षण अहवालावरुन दिसुन येत आहे तसेच ग्राहकाकडे एकुण वीज भार ०.२ कि.व्हॅट असल्याची नोंद केली आहे. वरील स्थळ निरिक्षण अहवालावरुन ग्राहकाचा जुन्या मीटर नुसार झालेला २७० युनिट प्रति माह वीज वापर समर्थनिय ठरु शकत नाही.

४) मंचाने नोडल अधिकारी यांना ग्राहकाचे बदली केलेल्या मीटरची चाचणी करुन त्याचा अहवाल सादर करण्यास सांगीतले असता मीटर उपलब्ध नसल्यामुळे चाचणी अहवाल सादर करता येत नाही असे लेखी निवेदन त्यांनी मचास सादर केले. त्यामुळे बदली केलेले मीटर फास्ट असल्याबाबतची ग्राहकाची तक्रार मान्य करुन नविन मीटरचे सरासरी नुसार वीज आकारणी करणे योग्य होईल असे मंचाचे मत आहे.

# आदेश

१) महावितरण कंपनीने ग्राहकास माहे मे २००७ ते जुलै २००९ या कालावधीत केलेली वीज आकारणी रद्द करण्यात येत आहे त्याऐवजी वरील कालावधीत २९ युनिट प्रति माह प्रमाणे वीज अकारणी करावी.तसेच ऑगस्ट २००९ ते सप्टेंबर २०१० या कालावाधीकरीता ४३३ युनिट ची सम प्रमाणात विभागणी करुन सुधारीत वीज देयक देण्यात यावे.

२) वरील सुधारीत वीज देयकात कोणतेही व्याज व दंडाची आकारणी करु नये. व ग्राहकाने पुर्वी भरलेल्या वीज देयकाची वजावट करावी.

३) मीटर चाचणी करीता ग्राहकाकडुन भरुन घेण्यात आलेली रक्कम रुपये १००/- मीटर चाचणी न केल्यामुळे ग्राहकास परत करावी.

वरील आदेशाचे पालन करुन त्याचा अहवाल तीस दिवसांच्या आंत मंचास सादर करावा.

**प्र. अ. सगणे**
**सदस्य/सचिव**

**विलासचंद्र सु. काबरा**
**सदस्य**

२०१०/३०